महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६

प्रकरण एक

प्रकरण एक

कलम १. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

१(१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ असे म्हणावे.

प्रकरण एक

कलम १. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ

१(२) ही संहिता सबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल, परंतु प्रकरण तीन (जमिनीवरील अतिक्रमणाच्या संबंधातील तरतुदी खेरीज करून) चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, बारा (कलम २४२ खेरीज करून) आणि सोळा (कलमे ३२७, ३२९, ३३०, (३३०-अ) ३३५, ३३६, आणि ३३७ खेरीज करून) यांच्या तरतुदी मुंबई शहरास लागू होणार नाहीत.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, या अधिनियमात,

२(१) **'कृषी वर्ष'** म्हणजे राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील त्या तारखेपासून सुरू होणारे वर्ष.

१ एप्रिल ते ३१ मार्च हा कालावधी 'कृषी वर्ष' मानला जातो.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२) **'दुमाला'** या संज्ञेचा अर्थ खंड किंवा जमीन महसूल देण्याचे राज्य शासनाचे हक्क जेथवर संबंधित असतील तेथवर पूर्णत: किंवा अंशत: कोणत्याही व्यक्तीच्या मालकीत हस्तांतरित झालेली, असा होतो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३) 'हद्दीची निशाणी' या संज्ञेचा अर्थ, उभी केलेली कोणतीही निशाणी, मग ती मातीची असो, दगडाची असो किंवा इतर पदार्थाची असो, आणि तसेच जमिनीच्या कोणत्याही भागाची हद्द नियोजित करण्याकरिता, त्याबाबत प्राधिकार असलेल्या भू-मापन अधिकाऱ्याने किंवा महसूल अधिकाऱ्याने उभारलेले, लावलेले किंवा निर्दिष्ट केलेले कोणतेही कुंपण, बिन-नांगरलेला बांध किंवा जमिनीची पट्टी किंवा अन्यथा, नैसर्गिक किंवा कृत्रिम वस्तू असा होतो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(४) 'इमारत' म्हणजे शेतातील इमारत नसलेले कोणतेही बांधकाम.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(५) 'इमारतीची जागा' म्हणजे बांधकाम करण्याच्या प्रयोजनाकरिता धारण केलेला जमिनीचा भाग, मग त्यावर प्रत्यक्षपणे कोणतीही इमारत उभारण्यात आली असो किंवा नसो, आणि त्यामध्ये, त्यावर उभारलेल्या कोणत्याही इमारतीने परिवेष्टित किंवा तिच्याशी संलग्न असेलेली मोकळी जागा किंवा अंगण यांचा समावेश होतो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(६) 'प्रमाणित प्रत' किंवा **'प्रमाणित उतारा'** म्हणजे, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ याच्या कलम ७६ अन्वये विहित केलेल्या रीतीने प्रमाणित केलेली, यथास्थिती प्रत किंवा उतारा.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(७) 'चावडी' म्हणजे गावाचा कारभार चालविण्यासाठी ग्राम अधिकाऱ्याकडून सर्वसाधारणपणे वापरण्यात येणारी जागा.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

<u>२(७-अ)</u> **'आधारसामग्री संचयिका'** म्हणजे संबंधित विभागाच्या जिल्हा प्रमुखाने निर्णायकतेने प्रमाणित केलेला आणि त्याने वेळोवेळी अद्ययावत करुन संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात सुस्थितीत ठेवलेल्या माहितीचा संचयिका संग्रह होय. जी संहिते अन्वये अकृषिक प्रयोजनासाठी जमिनीच्या वापराबद्दलची परवानगी देतांना संबंधित विभागाच्या आक्षेपाची, कोणतेही असल्यास, विनिश्चिती करून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडून वापरण्यात येईल.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(८) 'भू-संपत्ती' म्हणजे जमिनीतील कोणताही हितसंबंध आणि ती जमीन धारण करण्यास पात्र असलेल्या व्यक्तींकडे किंवा व्यक्तीसमूहांकडे निहित असलेले एकूण हितसंबंध.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(९)**‘ शेतातील इमारत'** या संज्ञेचा अर्थ, आकारणी केलेल्या किंवा शेतीच्या कारणाकरिता धारण केलेल्या जमिनीवर, अशा जमिनींच्या किंवा तिच्या धारकाच्या मालकीच्या किंवा त्याच्याकडून लागवड करण्यात येत असलेल्या कोणत्याही इतर जमिनींच्या संबंधातील पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी,

क) शेतीची अवजारे, खत किंवा वैरण साठविण्यासाठी;

ख) शेतीचे उत्पन्न साठविण्यासाठी;

ग) गुराढोरांना निवारा मिळण्यासाठी;

घ) जमीन धारकाच्या कुटुंबातील व्यक्तींच्या, सेवकांच्या किंवा कुळांच्या निवासासाठी किंवा

ङ) लागवडीसंबंधीच्या, त्याच्या व्यवस्थेचा एक अभिन्न भाग असलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी बांधलेले बांधकाम.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१०) **'गावठाण'** किंवा **'गावातील जागा'** म्हणजे, कलम १२२ अन्वये निश्चित करण्यात आल्याप्रमाणे गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेमध्ये समाविष्ट असलेली जमीन.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(११) 'शासकीय पट्टेदार' म्हणजे कलम ३८, अन्वये तरतुद केल्याप्रमाणे शासनाकडून पट्ट्याने जमीन धारण करणारी व्यक्ती.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१२) **'जमीन धारण करणे'** किंवा **'जमीन धारक असणे'** किंवा **'जमिनीचा धारक असणे'** म्हणजे वैधरीत्या जमिनीचा कब्जा असणे, मग ते प्रत्यक्षात असो किंवा नसो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१३) 'धारण जमीन' म्हणजे धारकाने धारण केलेला जमिनीचा भाग.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१४) धारण जमिनीच्या संबंधात **'सुधारणा'** या संज्ञेचा अर्थ ज्यामुळे जमिनीच्या किंमतीत महत्त्वपूर्ण वाढ होते व जे अशा जमिनीवर करणे योग्य आहे, तसेच ज्या कारणाकरिता जमीन धारण करण्यात आली असेल त्या कारणाशी जे सुसंगत आहे आणि जे काम धारण जमिनीवर केले नसेल, तरीही ते तिच्या प्रत्यक्षपणे फायद्यासाठी केलेले असेल किंवा काम झाल्यावर त्या जमिनीस प्रत्यक्षपणे फायदेशीर करून देण्यास येत असेल असे कोणतेही काम, असा होतो. आणि पूर्ववर्ती तरतुदींना अधीन राहून, त्यामध्ये,

क) शेतीच्या प्रयोजनांसाठी पाण्याचा साठा, पुरवठा किंवा वाटप करण्यासाठी तलाव, विहिरी, पाण्याचे पाट, बंधारे व इतर बांधकामे बांधणे;

प्रकरण एक
कलम २(१४).... व्याख्या

ख) जमिनीवरील जलनिस्सारणासाठी किंवा पुरामुळे किंवा धूप होण्यामुळे किंवा पाण्यामुळे होणाऱ्या इतर नुकसानीपासून जमिनीचे संरक्षण करण्यासाठी बांधकामे करणे;

ग) झाडे लावणे आणि जमीन लागवड योग्य करणे, साफ करणे, जमिनीला कुंपण घालणे, ती सपाट करणे किंवा ताली बांधणे;

घ) धारण जमिनींचा सोयीस्कररीत्या किंवा फायदेशीर उपयोग करण्यासाठी किंवा तिचा भोगवटा करण्यासाठी अशा धारण जमिनीवर किंवा तिच्या परिसरात गावठाणाव्यतिरिक्त इतरत्र इमारती बांधणे; आणि

प्रकरण एक

कलम २(१४).... व्याख्या

ड) वरीलपैकी कोणतेही बांधकाम पुन्हा नव्याने बांधणे किंवा त्याची पुन्हा बांधणी करणे किंवा त्यामध्ये फेरफार किंवा वाढ करणे. या गोष्टींचा समावेश होतो.

परंतु, त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होत नाही-

(एक) त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांकडून शेतीच्या नित्य व्यवसायात सामान्यत: करण्यात येणारी पुढील कामे म्हणजे, तात्पुरत्या विहिरी आणि पाण्याचे पाट व बंधारे बांधणे, जमीन सपाट करणे, कुंपण घालणे किंवा अन्य कामे करणे किंवा अशा प्रकारच्या कामात किरकोळ फेरबदल करणे किंवा दुरुस्ती करणे; किंवा

प्रकरण एक

कलम २(१४).... व्याख्या

(दोन) भोगवटादार किंवा कुळ म्हणून कोणत्याही इतर व्यक्तीच्या कब्जात कोठेही असलेल्या कोणत्याही जमिनीची किंमत वस्तुत: कमी करणारे कोणतेही काम;

स्पष्टीकरण: जे काम, अनेक धारण जमिनींना फायदेशीर होते ते अशा धारण जमिनींपैकी प्रत्येक धारण जमिनीच्या बाबतीत केलेली सुधारणा आहे असे समजण्यात येईल.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

<u>२(१५)</u> **'संयुक्त धारक'** किंवा **'संयुक्त भोगवटादार'** म्हणजे, जमिनीचे सहहिस्सेदार म्हणून ती धारण करणारे धारक किंवा भोगवटादार असा होतो. मग ते हिंदू कायद्यानुसार अविभक्त कुटुंबातील सहहिस्सेदार असोत किंवा अन्य रितीने असोत, आणि ज्यांच्या हिश्यांची मोजून-मापून विभागणी करण्यात आली नाही असे धारक किंवा भोगवटादार आणि जेव्हा जमीन संयुक्त धारकांनी किंवा संयुक्त भोगवटादारांनी धारण केली असेल तेव्हा, यथास्थिती, 'धारक' किंवा भोगवटादार म्हणजे सर्व संयुक्त धारक किंवा संयुक्त भोगवटादार.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१६) **'जमीन'** या संज्ञेत, जमिनीपासून मिळावयाच्या फायद्याचा आणि भूमीस संलग्न असलेल्या वस्तूंचा किंवा भूमीस संलग्न असलेल्या वस्तूंशी कायम जोडलेल्या कोणत्याही वस्तूंचा आणि तसेच, गावांच्या किंवा निश्चित केलेल्या इतर प्रदेशांच्या महसुलातील किंवा खंडातील हिस्सा किंवा त्यावरील आकार, यांचा समावेश होतो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१७) **'जमीन मालक'** म्हणजे जमीन पट्ट्याने देणारा.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१८) 'भूमि-अभिलेख' म्हणजे, या संहितेच्या तरतुदींअन्वये, किंवा त्याच्या प्रयोजनांकरिता ठेवलेले अभिलेख आणि त्या संज्ञेत राज्यांत अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, कोणत्याही क्षेत्रात अंमलात आलेल्या आणि अशा कायद्यान्वये किंवा अन्यथा कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेल्या अंतिम नगररचना योजनेचे, सुधारणा योजनेचे किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाच्या योजनेचे नकाशे व आराखडे यांच्या प्रतीचा समावेश होतो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(१९) **'जमीन महसूल'** म्हणजे, कोणत्याही व्यक्तीने धारण केलेल्या किंवा तिच्याकडे निहित असलेल्या जमिनीबद्दल किंवा तीत असलेल्या हितसंबंधाबद्दल किंवा त्यावर चालवता येण्याजोग्या हक्काबद्दल तिच्याकडून राज्य शासनाला किंवा राज्य शासनाच्या वतीने मिळालेल्या किंवा वैधरित्या मागणी करण्याजोग्या पैशाच्या स्वरूपातील सर्व रकमा किंवा द्यावयाच्या रकमा-मग अशा रकमा कोणत्याही नावाखाली देण्याजोग्या असोत, आणि राज्य शासनाने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअन्वये अधिकृत केलेला कोणताही उपकर किंवा पट्टी असा होतो आणि त्यात कोणत्याही जमिनीबद्दल इनामदाराकडून देण्याजोगे कोणतेही पट्टामूल्य (प्रिमियम), खंड, पट्ट्याची रक्कम, उक्तधारा (क्विटरेंट), जुडी किंवा कोणत्याही अधिनियमान्वये, नियमान्वये, करारान्वये किंवा लेखान्वये तरतुद केल्याप्रमाणे द्यावयाची इतर कोणतीही रक्कम यांचा समावेश होतो.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२०) **'विधि व्यवसायी'** या संज्ञेचा अर्थ, अधिवक्त्यांबाबत अधिनियम, १९६१ यात जो दिलेला असेल तोच असेल.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२१) **'अकृषिक आकारणी'** म्हणजे, अकृषिक प्रयोजनांसाठी केलेल्या जमिनीच्या उपयोगाच्या संदर्भात, या संहितेच्या तरतुदींअन्वये किंवा तद्न्वये केलेल्या नियमांन्वये कोणत्याही जमिनीवर निश्चित केलेली आकारणी.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२२) **'भोगवट्याची जमीन'** म्हणजे, भोगवटादाराने धारण केलेल्या जमिनीचा भाग.

२(२३) **'भोगवटादार'** म्हणजे, कू ळ किंवा शासकीय पट्टेदार खेरीज करुन, बिनदुमाला जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा असलेला धारक. परंतु प्रत्यक्ष कब्जा असणारा धारक हा कूळ असेल त्याबाबतीत, भूमिधारक किंवा यथास्थिती, वरिष्ठ जमीनमालक हा भोगवटादार आहे असे मानण्यात येईल.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२४) **'भोगवटा'** म्हणजे कब्जा.

२(२५) **'जमिनाचा भोगवटा करणे'** म्हणजे जमीन कब्जात असणे किंवा कब्जात घेणे.

२(२६) 'पार्डी जमीन' म्हणजे म्हणजे, गावठाणातील घरांशी संबंधित असलेली लागवड केलेली जमीन.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२७) कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात **'लोकसंख्या'** म्हणजे, ज्या जनगणनेची संबंधित आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे अशा निकटपूर्वीच्या जनगणनेत ठरविलेली लोकसंख्या.

२(२८) **'विहित'** म्हणजे, राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(२९) **'मान्यताप्राप्त अभिकर्ता'** म्हणजे, या अधिनियमान्वये कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकाराने, अशा कार्यवाहीमध्ये, त्याच्या वतीने उपस्थित राहण्यासाठी व अर्ज करण्यासाठी आणि इतर कामे करण्यासाठी लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३०) 'संबंधित कुळवहिवाट कायदा' म्हणजे,

अ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्राच्या संबंधात- मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८;

ब) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्राच्या संबंधात, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०; आणि

क) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशाच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३१) **'महसूल अधिकारी'** म्हणजे या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये नेमलेला आणि जमीन महसुलाच्या किंवा भूमापनाच्या, आकारणीच्या, हिशोबाच्या किंवा तत्संबंधी अभिलेखाच्या कामकाजात किंवा कामकाजांच्या संबंधाने नियुक्त केलेला कोणत्याही दर्जाचा प्रत्येक अधिकारी.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३२) 'महसुली वर्ष' म्हणजे, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील अशा दिनांकापासून सुरू होणारे वर्ष. महाराष्ट्रासाठी १ ऑगस्ट ते ३१ जुलै हे 'महसुली वर्ष' आहे.

२(३३) 'साझा' म्हणजे, कलम ४ अन्वये साझा म्हणून रचना करण्यात आलेल्या तालुक्यातील गावांचा गट.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३४) **'उपविभागीय अधिकारी'** म्हणजे, जिल्ह्याच्या एका किंवा अनेक उप-विभागांचा कार्यभार ज्याच्याकडे सोपविण्यात आला आहे असा सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी.

२(३५) **'भू-मापन क्रमांकाचा पोट-विभाग'** म्हणजे, भू-मापन क्रमांकाच्या ज्या विभागाचे क्षेत्रफळ आणि आकारणी, भूमि-अभिलेखांत ज्या भू-मापन क्रमांकाचा तो भाग असेल त्या क्रमांकानंतर, दर्शक क्रमांक देऊन स्वतंत्रपणे नोंदली असेल तो भाग.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३६) **'भू-मापन निशाणी'** म्हणजे, या संहितेच्या प्रयोजनांसाठी भू-करासंबंधी (कॅडस्ट्रल) भू-मापनाच्या प्रयोजनांसाठी उभारण्यात आलेली निशाणी.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३७) 'भू-मापन क्रमांक' म्हणजे, भूमी-अभिलेखात दर्शक क्रमांक देऊन त्याखाली जमिनीच्या ज्या विभागाचे क्षेत्रफळ आणि आकारणी स्वतंत्रपणे नोंदण्यात आली असेल तो जमिनीचा भाग. आणि त्यामध्ये-

एक) कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही क्षेत्रात अंमलात आलेली अंतिम नगररचना योजना,

सुधारणा योजना किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाची योजना यान्वये पुनर्प्रस्थापित भू-खंडाचा (प्लॉटस्) आणि

दोन) नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा या जिल्ह्यांतील खसरा क्रमांक म्हणून ओळखण्यात येणाऱ्या, कोणत्याही दशर्क क्रमांकाखाली भूमी अभिलेखात नमूद केलेल्या जमिनीच्या कोणत्याही भागाचा समावेश होतो.



प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३८) **'वरिष्ठ धारक'** म्हणजे प्रकरण १४ खेरीज, इतर भूमिधारकांकडून (ज्यांना कनिष्ठ धारक असे म्हटले आहे) खंड किंवा जमीन महसूल घेण्याचा हक्क ज्या भूमिधारकास आहे तो भूमिधारक असा होतो, मग तो अशा खंडाबद्दल किंवा जमीन महसुलाबद्दल किंवा त्यांच्या कोणत्याही भागाबद्दल राज्य शासनाला जबाबदार असो किंवा नसो.

परंतु दुमाला जमिनीचा धारक म्हणून भूमी अभिलेखात अधिकृतरीत्या नोंदण्यात आलेल्या धारकाने, विविक्षीत अशा विशिष्ठ परिस्थितीत, जमीन पुन्हा परत घेतली जाण्याच्या हक्कास अधीन राहून, खंडाच्या किंवा जमीन महसूलाच्या माफीसह जमीन दिलेली असेल तेव्हा, असा धारक, ज्याला ती जमीन दिली असेल, त्याच्या बाबतीत, त्याने अशा रीतीने दिलेल्या जमीनीचा वरिष्ठ धारक आहे असे मानण्यात येईल. आणि ज्याला जमीन देण्यात आली असेल तो, ज्याने जमीन दिली त्यांच्या बाबतीत अशा जमिनीचा कनिष्ठ धारक आहे असे मानण्यात येईल. आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, याची कलमे १४७, १५१ आणि १५२ च्या प्रयोजनांसाठी, यापुढे 'कुळ' या संज्ञेच्या व्याख्येत काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, तो अशा जमीन देणाऱ्या व्यक्तींचे कूळ आहे असे मानण्यात येईल.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(३९) **'भू-मापन अधिकारी'** म्हणजे, कलम ८ अन्वये, किंवा त्यामध्ये तरतूद केलेल्या रीतीने नेमलेला अधिकारी.

२(४०) **'कूळ'** म्हणजे, पट्टेदार--मग तो लेखान्वये जमीन धारण करणारा असो, किंवा तोंडी करारान्वये जमीन धारण करणारा असो, आणि त्यामध्ये, कब्जासहित कुळाचे हक्क गहाण घेणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो. परंतु त्यामध्ये प्रत्यक्षपणे राज्य शासनाकडून जमीन धारण करणाऱ्या पट्टेदाराचा समावेश होत नाही.

२(४१) **'भोगवट्यात नसलेली जमीन'** म्हणजे, भोगवटादार, कूळ किंवा शासकीय पट्टेदार यांनी धारण केलेल्या जमिनीखेरीज गावातील जमीन.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(४२) **'नागरी क्षेत्र'** म्हणजे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केलेले क्षेत्र. आणि **'नगरेतर क्षेत्र'** या शब्दप्रयोगाचा अर्थ त्यानुसार लावला जाईल.

प्रकरण एक

कलम २. व्याख्या

२(४३) **'गाव'** या संज्ञेत, नगराचा किंवा शहराचा आणि गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या सर्व जमिनींचा समावेश होतो.

२(४४) **'वाडा जमीन'** म्हणजे, गुरे-ढोरे बांधण्यासाठी किंवा पीक किंवा वैरण, खत किंवा तत्सम इतर वस्तू साठविण्यासाठी वापरलेली गावठाणातील खुली जागा असा होतो.

प्रकरण एक

कलम ३. महसुली क्षेत्र

या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, राज्याची विभागांमध्ये विभागणी करण्यात येईल आणि यामध्ये (मुंबई शहर धरून) एका किंवा अनेक जिल्ह्यांचा समावेश असेल, आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका किंवा अनेक उप-विभागांचा समावेश होऊ शकेल, आणि प्रत्येक उप-विभागामध्ये एका किंवा अनेक तालुक्याचा समावेश होऊ शकेल आणि प्रत्येक तालुक्यामध्ये विवक्षित गावांचा समावेश होऊ शकेल.



प्रकरण एक

कलम ४. महसुली क्षेत्रांची रचना

(१) राज्य शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे-

(एक) ज्या जिल्ह्यांचा मिळून एक विभाग होईल ते जिल्हे (मुंबई शहर धरून);

(दोन) ज्या उप-विभागांचा मिळून एक जिल्हा होईल ते उप-विभाग;

(तीन) ज्या तालुक्यांचा मिळून एक उप-विभाग होईल ते तालुके;

(चार) ज्या गावांचा मिळून एक तालुका होईल ती गावे;

(पाच) ज्या स्थानिक क्षेत्रांचे मिळून एक गाव होईल ते स्थानिक क्षेत्र;

या गोष्टी विनिर्दिष्ट करता येतील; आणि-



(सहा) अशा रितीने रचना करण्यात आलेल्या अशा कोणत्याही महसुली क्षेत्राच्या हद्दींमध्ये एकीकरण करून, विभागणी करून किंवा इतर कोणत्याही रितीने फेरबदल करता येईल किंवा असे कोणतेही महसुली क्षेत्र रद्द करता येईल आणि अशा कोणत्याही महसुली क्षेत्रास नाव देता येईल व त्याच्या नावामध्ये फेरबदल करता येईल;

आणि जेव्हा कोणत्याही क्षेत्रास पुन्हा नाव दिले असेल अशा कोणत्याही बाबतीत, कोणत्याही कायद्यान्वये, लेखान्वये किंवा इतर दस्तऐवजामध्ये त्या क्षेत्रासंबंधी त्याच्या मूळच्या नावाने असलेले सर्व उल्लेख हे, अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल, तर त्या क्षेत्रात पुन्हा जे नाव दिलेले असेल त्या नावासंबंधीचे उल्लेख असल्याचे समजण्यात येईल.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर,

१) राज्य शासन, तत्सम अधिसूचनेद्वारे प्रत्येक वाडी आणि वेगळे निवासस्थान असलेल्या एखाद्या गावाच्या गावठाणाच्या हद्दीबाहेरील कोणतेही क्षेत्र, गाव म्हणून प्रस्थापित करील.

(अशा वाडीची किंवा क्षेत्राची लोकसंख्या तीनशेपेक्षा कमी नसेल) जी, तहसीलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा महसूल अधिकारी निश्चित करील) आणि अशा रीतीने प्रस्थापित केलेल्या गावाच्या हद्दी त्या अधिसूचनेत निर्दिष्ट करील.

२) जिल्हाधिकाऱ्यास, विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशाद्वारे, तालुक्यातील ज्या गावांचा मिळून एक साझा होईल अशा गावांची, आणि तालुक्यातील ज्या साझ्यांचे मिळून एक मंडल होईल अशा साझ्यांची रचना करता येईल. आणि अशा रितीने रचना करण्यात आलेल्या कोणत्याही साझ्याच्या किंवा मंडलाच्या हद्दींमध्ये फेरबदल करता येईल किंवा कोणत्याही साझा किंवा मंडल रद्द करता येईल.

३) हा अधिनियम अंमलात येण्याच्या वेळी अस्तित्वात असलेले विभाग, जिल्हे, उप-विभाग, तालुके, मंडले, साझे आणि गावे ही, या कलमान्वये अन्यथा त्यात फेरबदल केले नसतील तर, असे विभाग, जिल्हे, उप-विभाग, तालुके, मंडले, साझे आणि गावे म्हणून त्यांची अनुक्रमे जी नावे असतील त्याच नावाने चालू राहतील.

४) या कलमान्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना किंवा आदेश पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असेल. आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २४ च्या तरतुदी, ज्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीनंतर करावयाच्या नियमांच्या संबंधात लागू होतात, त्याप्रमाणे त्या शक्य असेल तेथवर, अशा अधिसूचनेच्या किंवा आदेशाच्या संबंधात लागू होतील.

डॉ. संजय कुंडेटकर,

उपजिल्हाधिकारी

महाराष्ट्र शासन